# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# गृहपाठ

## बी. ए. राज्यशास्त्र

तृतीय वर्ष (सत्र ५ व सत्र ६)

२०१७–१८

प्रती : ३००

# गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी पुढील सूचना वाचाव्यात व त्याप्रमाणे गृहपाठांचे काम करावे.

१. बी. ए. (विशारद) सामाजिकशास्त्रे या अभ्यासक्रमातील गृहपाठ लेखन हा महत्त्वाचा आणि अनिवार्य भाग आहे. गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्याने संबंधित विषयाचे पुस्तक वाचून मगच गृहपाठ लिहिणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा विषयाचा अभ्यास होतो. स्वयंअध्ययनाची सवय व्हावी व उत्तरपत्रिका लेखनाचा सराव व्हावा, हाच गृहपाठ लेखनामागील हेतू आहे.

२. गृहपाठ लिहिताना पुस्तकातील मजकुराची केवळ नक्कल करू नये. विद्यार्थ्याने विषय समजून घेऊन गृहपाठ लिहिला आहे की नाही हे जाणीवपूर्वक पाहिले जाते आणि त्याप्रमाणे गुण दिले जातात.

३. गृहपाठ त्यांच्या अनुक्रमानुसार व सलग लिहावेत. एक गृहपाठ संपल्यावर ठळक रेघ मारून पुढील ओळीवर अथवा नव्या पानावर पुढील गृहपाठ लिहावा. उत्तरात लाल शाईचा वापर करू नये. योग्य समास सोडावा.

४. मोठ्या प्रश्नांचे उत्तर ४० ते ५० ओळींत असावे. गरजेनुसार जास्त चालेल. टीपा लिहा प्रत्येकी २०–२५ ओळींत उत्तर असावे.

५. उत्तरात गरज असेल तिथे १, २, ३...... असे आकडे घालावेत.

६. उत्तराला सुरुवात करताना प्रास्ताविक व उत्तराच्या शेवटी समारोप असेल, तर ते उत्तर अधिक चांगले मानले जाते.

**७. सत्र ५ व सत्र ६ चे गृहपाठ एकत्रित दिलेले आहेत, याची नोंद घ्यावी.**

८. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'क्षेत्रीय कार्य' अथवा उपक्रम हा प्रश्न घालण्यात आला आहे. त्यासाठी अवांतर वाचन व सद्यःस्थितीतील घडामोडींचे निरीक्षण आवश्यक आहे.

## गृहपाठ सादर करण्याची मुदत

| **सत्र** | **विना विलंबशुल्क** | **विलंब शुल्कासह** |
|---|---|---|
| पाचवे | १५ ऑक्टोबर २०१७ | ३१ ऑक्टोबर २०१७ |
| सहावे | २८ फेब्रुवारी २०१८ | १५ मार्च २०१८ |

# भारताचे परराष्ट्र धोरणभाग – १ (PC-501) -

## सत्र – ५

## प्रकरण क्र. १ ते ५

---

**प्र. १. भारत आणि अमेरिका संबंधाची चर्चा करून भारत आणि अमेरिकेच्या सहकार्याच्या नवीन धोरणावर प्रकाश टाका** **गुण : १५**

**प्रस्तावना –** १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने लगेच अलिप्ततावादाचे धोरण स्वीकारले. सुरुवातीला अमेरिकेने भारताशी मैत्री दाखविली, परंतु अलिप्ततेच्या नावावर भारताने ती नाकारली.

**भारत आणि अमेरिका संबंध –**

१) भारताच्या अलिप्ततावादी धोरणाकडे अमेरिकेने साशंकतेने पाहिले.

२) आंतरराष्ट्रीय प्रश्नांबाबत दोन्ही राष्ट्रांची परस्परविरोधी भूमिका, उदाहरणार्थ – साम्यवादी चीनला भारताने दिलेली मान्यता, बर्लिनचा प्रश्न, व्हिएतनामचा प्रश्न, भारताचे रशियाकडे झुकणे. इत्यादींमुळे भारत व अमेरिका यांच्यातील संबंधांमध्ये चढ–उतार आल्याचे दिसून येते. अमेरिकेला भारताबद्दल अविश्वास.

३) १९६२ च्या भारत –चीन युद्धात अमेरिकेचा भारताला राजकीय पाठिंबा

४) १९६५ च्या भारत – पाक युद्धात अमेरिकेचा पाकिस्तानला पाठिंबा, त्यामुळे भारत–अमेरिका या दोन देशांत कटुता निर्माण झाली.

५) १९७१ साली बांगलादेशाच्या स्वातंत्र्यासाठी भारताने लष्करी कारवाई केली. त्यावेळी अमेरिकेचे धोरण पक्षपाती होते. अमेरिकेने भारतावर लष्करी दबाव आणण्याचा प्रयत्न केला. अमेरिकेचे आरमार बंगालच्या उपसागरात आले.

६) १९७३–७४ या दरम्यान दोन्ही देशांचे संबंध सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू झाले. या दोन्ही देशांत आर्थिक, व्यापारी, वैज्ञानिक, तांत्रिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संबंध जोपासण्याचा प्रयत्न करण्यात आला.

७) १९७४ – भारताने अणुस्फोट घडवून आणला. अमेरिकेचा तीव्र निषेध, भारतावर आर्थिक निर्बंध.

८) १९९१ – रशियाच्या विघटनामुळे भारताला अमेरिकेशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करण्याशिवाय पर्याय उरला नाही.

९) २००९ मध्ये अमेरिकेवर दहातवादी हल्ला, त्यामुळे भारताच्या दहशतवाद विरोधी मोहिमेस सहकार्य करण्याचे अमेरिकेने जाहीर केले.

१०) २००८ भारत–अमेरिका अणुऊर्जा करार, अण्वस्त्र निर्माण करणार नाही, या अटीवर अमेरिका भारताला मदत करण्यास तयार.

११) मोदी पंतप्रधान – मोदी डिप्लोमसी –बराक ओबामा व नरेंद्र मोदींची घनिष्ट मैत्री – अमेरिका–भारत संबंध पूर्वी कधीही नव्हते इतके सौहार्दाचे –

१२) डोनाल्ड ट्रंप यांचे नोकरी देण्याविषयीचे धोरण भारतविरोधी – व्हिसाचा प्रश्न – परंतु दहशतवादाविरोधी दोन्ही देश – संबंध मैत्रीपूर्ण. भारत व अमेरिका हे दोन्ही देश जगातील सर्वांत मोठे लोकशाही देश असूनही पं. नेहरूंच्या साम्यवादी रशियाकडच्या ओढीमुळे भारत आतापर्यंत अमेरिकेपासून दूर राहिला. एवढेच नाही

तर अमेरिकेवर सतत टीका करीत राहिला. परंतु त्यामुळे भारत–अमेरिका संबंधात दुरावा व अविश्वास निर्माण होऊन भारताचे नुकसान झाले.

समारोप –

**प्र. २. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे पुढील मुद्द्यांच्या आधारे विवेचन करा. गुण : १५**

**अ) परराष्ट्र धोरण निश्चित करणारे घटक आ) भारताच्या परराष्ट्र धोरणापुढील प्रश्न**

**प्रस्तावना – परराष्ट्र धोरण निश्चित करणारे घटक**

१) भौगोलिक परिस्थिती २) विचार प्रणाली ३) लष्करी क्षमता ४) लोकसंख्या ५) आर्थिक स्थिती ६) लोकमत ७) नैसर्गिक साधनसंपत्ती ८) ऐतिहासिक पार्श्वभूमी ९) आंतरराष्ट्रीय परिस्थिती १०) परराष्ट्र धोरणकर्ते व पुढारी, नेतृत्व (शासनकर्ते) ११) विधिमंडळाचे (कायदेमंडळ) धोरण

**भारताच्या परराष्ट्र धोरणापुढील प्रश्न –**

१) शेजारील राष्ट्रांतील राजकीय अस्थिरता २) पाकिस्तानचा प्रश्न ३) बाजूच्या आक्रमक राष्ट्रांची युती व घेराव ४) अमेरिकेशी संबंध सुधारताना रशियाशी मैत्री टिकविणे ५) तिसऱ्या जगातील भारताची भूमिका ६) नवीन अर्थव्यवस्था ७) अण्वस्त्रीकरण व नि:शस्त्रीकरण ८) मानवी हक्कांचे रक्षण ९) स्फोटक आंतरराष्ट्रीय परिस्थिती १०) संघर्षाचे क्षेत्र युरोपकडून आशिया खंडाकडे ११) नववसाहतवाद १२) वाढता दहशतवाद

समारोप – स्वप्नाळू आदर्शवादापेक्षा वास्तववादी परराष्ट्र धोरण हवे.

**प्र. ३. पुढील प्रश्नांची २५–३० ओळींत उत्तरे लिहा. (कोणतीही दोन) गुण : १५**

**अ) अलिप्ततावादाच्या चळवळीच्या उदयाची कारणे स्पष्ट करा.**

**प्रस्तावना –** १) जगाची दोन गटांत विभागणी २) लष्करी करारापासुन मुक्त राहण्याची इच्छा ३) राष्ट्रवाद ४) सहकार्याची भावना ५) आर्थिक सहकार्य ६) वसाहतवादास विरोध ७) सांस्कृतिक व वांशिक बंध

समारोप

**आ) काश्मीरच्या प्रश्नाबद्दलची अमेरिकेची भूमिका स्पष्ट करा.**

**प्रस्तावना –** शीतयुद्धकालीन भूमिका–शीतयुद्धोत्तर भूमिका–११ सप्टें२००१ रोजी अमेरिकेत झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतरची बदललेली भूमिका–इस्लामी अतिरेकी दहशतवादाला विरोध–अल् कायदा व तालिबान विरोध – या संदर्भात पाकिस्तानातून होणाऱ्या दहशतवादास विरोध व पाकवर दबाव

समारोप

**इ) भारत रशिया संबंधात १९९१ नंतर झालेल्या बदलांची चर्चा करा.**

**प्रस्तावना –** अगदी प्रारंभी या दोन देशातील संबंध एवढे मित्रत्वाचे नव्हते. १९५० मध्ये चीनच्या साम्यवादी राजवटीला भारताने दिलेली मान्यता व भारताचा वसाहतवादाला असणारा विरोध यांमुळे दोन्ही देशांचे संबंध वाढण्यास सुरुवात झाली.

**भारत आणि रशिया संबंध**

१) १९५० नंतर संबंध वाढण्यास सुरुवात झाली. २) १९५६ साली सुवेझ कालव्याच्या प्रश्नात दोन्ही देशांची समान भूमिका ३) १९६२ च्या भारत–चीन युद्धात रशिया तटस्थ. ४) १९६५ च्या भारत–पाक युद्धात

रशिया–ताश्कंद करारात पाकिस्तानच्या बाजूने ५) १९७१ मध्ये भारत –रशिया यांच्यात मैत्री व सहकार्य करार ६) काश्मीर प्रश्नाबाबत रशिया भाताच्या बाजूने ठामपणे उभा राहिला. ७) आर्थिक, विज्ञान, तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला रशियाने पूर्ण सहकार्य केले. ८) संरक्षण व अवकाश क्षेत्रातही भारताला महत्त्वपूर्ण मदत रशियाने केली. ९) १९९१ मध्ये रशियाचे विघटन – रशियाच्या विघटनामुळे रशियाला भारताकडे पुरेसे लक्ष देता आले नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणातील महासत्ता म्हणून रशियाचे महत्त्व कमी झाले. तरी लष्करी साधनसामग्री पुरविण्याच्या क्षेत्रात रशिया–भारत सहकार्य अजूनही पूर्वीप्रमाणेच चालू आहे. मध्यंतरी अमेरिकेने भारताशी अणुऊर्जा करार केला. पण इंधन विनाअट पुरवण्यास नकार दिला. तेच इंधन रशियाने विनाअट त्वरित भारताला पुरवले. रशिया–भारत मैत्री महत्त्वपूर्ण आहे.

समारोप – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**ई) अलिप्ततावादी चळवळीच्या भवितव्याची चर्चा करा.**

**प्रस्तावना –** अलिप्ततावादाचा अर्थ, व्याख्या, उदयाची पार्श्वभूमी किंवा स्वरूप याबाबत थोडक्यात माहिती लिहावी.

अलिप्ततावादी चळवळीचे भवितव्य – सध्याच्या परिस्थितीत अलिप्ततावादी चळवळ उपयुक्त आहे का, असा प्रश्न केला जात आहे. कारण, दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या दोन महासत्ता, त्यांच्यातील संघर्ष, शीतयुद्ध, लष्करी करार व अण्वस्त्र स्पर्धा इत्यादींमुळे अलिप्ततावादी चळवळीची आवश्यकता होती. परंतु आता मात्र आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील परिस्थिती बदलली आहे. उदाहरणार्थ – १९९० नंतर रशियाचे झालेले विघटन, शीतयुद्धाची समाप्ती, अमेरिका ही एकमेव महासत्ता अस्तित्वात असणे इत्यादी कारणांमुळे अलिप्ततावादी उपयुक्तता (गरज) उरली नाही असे म्हटले जाते. मात्र असे जरी असले तरी आजही अलिप्ततावादी चळवळ उपयुक्त आहे. कारण सध्याची विश्वरचना एककेंद्री व अमेरिकेभोवती सत्तेचे केंद्रीकरण करणारी आहे. यासाठी सर्व आफ्रो – आशियाई राष्ट्रांनी एकत्र येणे आवश्यक आहे.

समारोप.

**प्र. ४. टिपा लिहा. (कोणत्याही दोन) गुण : १५**

**अ) भारत आणि अमेरिकेची दहशतवादाबद्दलची भूमिका**

**प्रस्तावना –** दहशतवादाबद्दलची भारताची भूमिका –पाक पुरस्कृत दहशतवादाचा भारताला बसलेला फटका–भारताची शांततावादी भूमिका–काश्मीरमधील पाकिस्तानी दहशतवाद –

२००१ पूर्वीची अमेरिकेची भूमिका – ११ सप्टें २००१ नंतरची अमेरिकेची भूमिका – ओसामा–बिन–लादेनला पकडण्याची व मारण्याची मोहीम–अफगाणिस्तान व पाकिस्तानात लष्करी कारवाई

समारोप – दोन्ही देश दहशतवादाविरुद्ध आहेत.

**आ) अलिप्ततावादी चळवळीची उद्दिष्टे**

**प्रस्तावना –** १) लष्करी गटात सामील होण्यास विरोध करणे २) स्वतंत्र धोरण आखणे २) सार्वत्रिक युद्धात न गुंतण्याची इच्छा ४) जागतिक शांततेचे रक्षण करणे ५) आर्थिक विकास साध्य करणे ६) आर्थिक आणि तांत्रिक मदत मिळवणे ७) संयुक्त राष्ट्रांच्या कार्यात सहकार्य करणे.

समारोप –

**इ) भारत–रशिया लष्करी क्षेत्रातील सहकार्य**

**प्रस्तावना –** १९६२ – भारत–चीन युद्धावेळी घेतलेली भूमिका. १९६५ – भारत–पाक युद्धाच्यावेळी घेतलेली भूमिका. १९७१ – बांग्लादेश युद्धात पाठिंबा. १९७४ – अणुचाचणी नंतर अमेरिका व फ्रान्सचा भारताला क्रायोजेनिक टेक्नॉलॉजी देण्यास नकार. पाणबुड्या – मिग – २९ व मिग – ३१ ही लढाऊ विमाने दिली. १९७१ – नंतर रशियाने भारताला लष्करीदृष्ट्या महत्त्वपूर्ण सहकार्य केले.

समारोप

**ड) परराष्ट्र धोरणाची व्याख्या, अर्थ व उद्दिष्टे**

**प्रस्तावना –** परराष्ट्र धोरणाची व्याख्या व अर्थ – परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे – १) राष्ट्राची सुरक्षितता २) राष्ट्रीय एकात्मता टिकवणे ३) आर्थिक विकास ४) प्रतिष्ठेचे जतन ५) जागतिक शांतता व सुव्यवस्था – समारोप.

**प्र. ५. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे मूल्यमापन करा.**

**प्रस्तावना –** १) अति आदर्शवाद (पंचशील) २) शांततेवर भर ३) अलिप्ततावादाचा तोटा ४) मोदींच्या काळातील वास्तववाद ५) अमेरिका मैत्री व रशियाशीही मैत्रीचे संबंध ६) अलिप्ततावादाचे नेतृत्व ७) १९६२ च्या चिनी आक्रमणापासून परराष्ट्र धोरणातील बदल ८) अणु सज्जता ९) अरब राष्ट्रांशी मैत्री १०) संयुक्त राष्ट्रसंघातील भूमिका ११) बांगलादेशाची निर्मिती १२) जागतिकीकरण १३) संयुक्त राष्ट्रसंघटनेतील योगदान १४) शेजारी राष्ट्रांशी संबंध सुधारणा.

समारोप.

**किंवा**

**क्षेत्रीय कार्य –** 'पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या कारकीर्दीपासून भारताचे परराष्ट्रधोरण अधिक वास्तववादी बनले आहे.' यावर पुढील मुद्द्यांच्या आधारे २ ते ३ फुलस्केप पाने टिपण तयार करा. यासाठी वृत्तपत्रातील व दूरदर्शन वाहिन्यांवरील वस्तुनिष्ठ बातम्यांचा आधार घ्या. **गुण : २०**

१) नेपाळ, भूतान, श्रीलंका, बांग्लादेश, पाकिस्तान व चीन या शेजारी देशांशी संबंध सुधारण्याचे प्रयत्न. २) अमेरिकेशी संबंध सुधारले– ओबामा व आता ट्रम्प यांच्या काळात. ३) रशियाशी संबंध सुधारणा ४) युरोपीय देशांशी संबंध सुधारणा. ५) जपानशी संबंध सुधारणा. ६) याचा आर्थिक फायदा, इतर फायदे. ७) आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताची प्रतिमा उजळली.

समारोप.

---

# भारताचे परराष्ट्र धोरण (PC-601)
## सत्र – ६
## प्रकरण क्र. ६ ते १२

---

**प्र. १. भारत–पाकिस्तान संबंधात तणाव निर्माण करणाऱ्या प्रश्नांची चर्चा करा.** **गुण : १५**

**उत्तर – प्रस्तावना –** काश्मीर प्रश्न, १९६५ चे भारत–पाक युद्ध, ताश्कंद करार, पाणी वाटपाचा प्रश्न, १९७१ चे बांग्ला देश स्वातंत्र्य युद्ध, सिमला करार, भारतातील विशेषतः काश्मीरमधील पाक पुरस्कृत दहशतवाद.

समारोप.

**प्र. २. भारत–श्रीलंका संबंधाची चर्चा करा.** **गुण : १५**

**उत्तर – प्रस्तावना –** भारत आणि श्रीलंका या दोन्ही ब्रिटिशांच्या वसाहती होत्या. १९४७ मध्ये भारताला तर १९४८ मध्ये श्रीलंकेला स्वातंत्र्य प्राप्त झाले. भारत–श्रीलंका संबंध – श्रीलंकेत दोन प्रमुख वंश – सिंहली व तमिळ होय. यांच्यात वांशिक संघर्ष, तमिळांना पूर्वीपासूनच श्रीलंकेचे नागरिकत्व दिले नव्हते. श्रीलंकेमध्ये स्थायिक झालेल्या मूळ भारतीयांच्या नागरिकत्वाचा प्रश्न, भारतातील तमिळांचा केंद्र सरकारवर दबाव, भारताने श्रीलंकेत शांतिसैन्य पाठविले, शांतता प्रयत्नांना अपयश, यातूनच LTTE (लिट्टे) या संघटनेचा तमिळ भूमीच्या मागणीसाठी संघर्ष चालू. १९९१ मध्ये राजीव गांधी यांची हत्या, यानंतर भारताने श्रीलंकेतील आपले लक्ष कमी केले. श्रीलंकेच्या लष्कराने लष्करी कारवाई करून LTTE चा पाडाव केला. यात LTTE चा प्रमुख नेता प्रभाकरन, त्याचा मुलगा व कुटुंबीय यांची हत्या केली. तमिळींचा विरोध चिरडून टाकला.

समारोप – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**प्र. ३. पुढील प्रश्नांची २५–३० ओळींत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **गुण : १५**

**अ) भारत–नेपाळ संबंध ठरविणारे घटक स्पष्ट करा.**

**प्रस्तावना –** १) ब्रिटिश राजवट २) सांस्कृतिक, धार्मिक घटक ३) सामाजिक घटक ४) सैन्यातील गोरखा पलटण ५) भौगोलिक स्थान ६) नेपाळचे भारतावरील अवलंबित्व ७) भारत–नेपाळ सहकार्य व मैत्रीचा करार. ८) भारत–नेपाळ हितसंबंध. समारोप.

**ब) भारत–बांग्लादेश संबंधांतील समस्यांची चर्चा करा.**

**प्रस्तावना –** १) सीमारेषा अधोरेखित करण्याचा प्रश्न २) फराक्का धरणाचा आणि नदी पाणी वाटपाचा प्रश्न. ३) निर्वासितांचा प्रश्न ४) न्यू मूर बेटाच्या मालकी हक्काचा प्रश्न ५) बांगलादेशातील धार्मिक मूलतत्त्ववादाचा प्रसार. समारोप.

**क) सार्कची उद्दिष्टे व सार्कची मूलतत्त्वे स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** सार्कची उद्दिष्टे, सार्कची मूलतत्त्वे. समारोप.

**ड) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या (युनो) यशापयशाचे वर्णन करा.**

**प्रस्तावना – संयुक्त राष्ट्र संघाचे यश –** १) राजकीय क्षेत्रात मर्यादित यश २) तिसरे महायुद्ध टाळण्यात यश. ३) स्वातंत्र्य व सार्वभौमत्वाचे रक्षण ४) शीतयुद्धकालीन संघर्ष टाळण्यात यश.५) मानवाधिकार रक्षण. ६) वांशिक हिंसाचार रोखण्यात काही प्रमाणात यश ७) मानवतेसाठी कार्य ८) कामगारांसाठी कार्य ९) शैक्षणिक, सांस्कृतिक व वैज्ञानिक कार्य १०) नाणेनिधी व बँकेमार्फत विकास कार्य.

**अपयश –** १) अरब–इस्राएल संघर्ष सोडवण्यात अपयश २) इराक प्रश्न ३) अमेरिकेला वेसण घालण्यात अपयश ४) काश्मीर प्रश्न ५) गरीब देशांचे शोषण ६) वर्णद्वेष, वंशद्वेष रोखण्यात अपयश ७) शस्त्रास्त्र नियंत्रण ८) समतेच्या पायाचा अभाव ९) युनोच्या रचनेत (उदा. सुरक्षा समिती) उणिवा.

समारोप.

**प्र. ४. टिपा लिहा. (कोणत्याही दोन)** **गुण : १५**

**अ) भारत–चीन सीमावाद**

**प्रस्तावना –** १९१४ सालची 'मॅकमोहन सीमारेषा' अरुणाचल प्रदेश, भूतान, सिक्कीमवर मालकी सांगतो – पाकव्याप्त काश्मीरमधून चीन व पाकिस्तानला जोडणारा रस्ता बांधला आहे. आता पाकव्याप्त काश्मीरमध्ये आर्थिक तळ उभारत आहे, भारताला चीनचा विस्तारवाद धोक्याचा. समारोप.

**ब) सिमला करार**

**उत्तर – प्रस्तावना –** १९७१ च्या भारत–पाक युद्धातील भारताच्या विजयानंतर सिमला येथे भारत–पाक दरम्यान झालेला करार–

१) वाद संपवून मैत्रिपूर्ण संबंध – वाद मैत्रिपूर्ण चर्चेतून सोडविले जातील.
२) परस्परांविरुद्ध शक्तीचा प्रयोग करणार नाहीत.
३) परस्परांबद्दल प्रसारमाध्यमांतून विरोधी प्रचार करणार नाहीत.
४) आर्थिक, विज्ञान व सांस्कृतिक क्षेत्रात परस्पर सहकार्य वाढविणे.
५) नागरिकांमध्ये सामंजस्य वाढवण्याकरिता येण्या–जाण्याच्या सोयी दोन्ही देशांनी वाढवाव्यात.
६) १९७१ च्या युद्धबंदी रेषेचा भंग करू नये.
७) दोन्ही देशांनी आपापले सैन्य परत आंतरराष्ट्रीय सीमेपर्यंत न्यावे.
८) भविष्यात शांतता टिकवण्यासाठी दोन्ही देशांचे प्रतिनिधी वेळोवेळी भेट घेऊन चर्चा करतील.

प्रत्यक्षात पाकने दहशतवादी घुसखोरी कारवाया करून अनेकदा सिमला कराराचे उल्लंघन केले.

समारोप.

**क) सार्कच्या समस्या**

**प्रस्तावना –** १) वैचारिक भिन्नता २) परस्पर सहकार्याचा अभाव ३) दहशतवाद ४) हस्तक्षेप ५) परस्पर अविश्वास ६) परस्परांतील संघर्ष ७) अण्वस्त्र प्रसार किंवा परस्पर आण्विक भीती ८) सुरक्षिततेचा प्रश्न. समारोप.

**ड) भारत आणि संयुक्त राष्ट्र संघटना**

**प्रस्तावना –** संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेची पार्श्वभूमी, रचना, कार्य व योगदान याबाबत अगदी

थोडक्यात लिहिणे.

**भारत आणि संयुक्त राष्ट्र संघटना –** १) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कार्यामध्ये भारताने बजावलेली भूमिका व योगदान याबाबत सविस्तर लिहिणे. २) भारत आणि सुरक्षा परिषद – सुरक्षा परिषदेच्या कायमच्या सदस्यत्वासाठी भारताने आपली दावेदारी १९९४ मध्ये घोषित केली. आपली दावेदारी घोषित करण्याची कारणमीमांसा स्पष्ट करणे. ३) सुरक्षा परिषदेच्या विस्ताराबाबत भारताची भूमिका विशद करणे. ४) सुरक्षा परिषदेच्या लोकशाहीकरणाचा प्रश्न याबाबत थोडक्यात लिहिणे.

वरील मुद्द्यांच्या आधारे भारत आणि संयुक्त राष्ट्र संघटना यांच्यातील संबंध थोडक्यात लिहिणे.

समारोप – संयुक्त राष्ट्र संघटनेचे यशापयश थोडक्यात लिहिणे. तसेच वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**प्र. ५. भारत आणि चीन संबंधांवर टिपण लिहा. गुण २०**

**प्रस्तावना –** १) भारत व चीन या दोन प्राचीन देशांमधील संबंध हे ब्रिटिशांच्या आगमनापर्यंत सलोख्याचे व सहकार्याचे होते. याबाबत थोडक्यात लिहिणे.

भारत आणि चीन संबंध

१) सीमावाद (सीमासंघर्ष/सीमावादाचा प्रश्न) २) तिबेटचा प्रश्न – तिबेटच्या प्रश्नावरून भारत–चीन संबंधामध्ये तणाव निर्माण झाला. ३) १९५४ मध्ये भारत – चीन यांच्या दरम्यान करार, यात भारताने तिबेट हा चीनचा अविभाज्य भाग असल्याचे मान्य केले. ४) १९५५ व त्यानंतरच्या काळातही सीमावादाच्या प्रश्नावरून भारत–चीन संबंधामध्ये तणाव, चीनने लडाख व अक्साई चीन या भागात घुसखोरी करून काही भारतीय प्रदेशांवर ताबाही मिळवला. ५) १९६२ मध्ये चीनचे भारतावर आक्रमण ६) १९६५ आणि १९७१ च्या भारत–पाकिस्तान युद्धात चीनने पाकिस्तानची बाजू उचलून धरली. तसेच चीनची काश्मीर प्रश्नासंबंधीची भूमिका पाकिस्तान धार्जिणी ७) १९७४ मध्ये सिक्कीमचे भारतात विलीनीकरण, पोखरण येथे अणुस्फोट या दोन्ही घटनांचा चीनकडून निषेध ८) १९७५ मध्ये राजनैतिक संबंधास पुन्हा सुरुवात ९) २००४ मध्ये सीमारेषेवरील व्यापार वाढावा या उद्देशाने भारत व चीन सीमेवरील नथूला खिंड व्यापारासाठी मुक्त करण्यात आली. १०) पाकव्याप्त काश्मीरमध्ये चीन तळ उभारत आहे. त्यामुळे भारताला गंभीर धोका.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या शेजारी देशांशी– नेपाळ, बांग्लादेश, श्रीलंका इ. संबंध सुधारण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या नेतृत्वाने युरोपीय देश व अमेरिकेतही भारताची प्रतिमा सुधारली आहे. भारत–अमेरिका संबंधात मैत्रीपूर्ण वाढ झाली आहे. या सगळ्यावर चीन नाराज आहे. नुकतीच चीनने नथुला खिंड व्यापार व यात्रेकरूंसाठी बंद केली. तसेच सिक्कीम, अरुणाचल प्रदेशात मोठ्या प्रमाणावर घुसखोरी, कब्जा सुरू आहे.

समारोप – चीनपासून भारताने नेहमी सावध असणे अतिशय गरजेचे आहे. त्या दृष्टीने आपले लष्करी बळ वाढवणे गरजेचे. हे वरील भारत आणि चीन यांच्या संबंधातून निदर्शनास येते.

**Reference -** India's Foreign Policy - Emerging Challenges and Paradigms - Upereti B. C., Sharma Mohanlal, Kaushik S. N., Vol. I & II.

---

# राजकीय समाजशास्त्र (PC-502)
## सत्र – ५
## प्रकरण क्र. १ ते ५

---

**प्र. १. राजकीय सामाजिकीकरणाची व्याख्या सांगा. राजकीय सामाजिकीकरणाच्या साधनांची चर्चा करा.**
**गुण : १५**

**उत्तर – प्रस्तावना –** राजकीय सामाजिकीकरणाचे स्वरूप व वैशिष्ट्ये अगदी थोडक्यात स्पष्ट करणे. राजकीय सामाजिकीकरणाची व्याख्या – डेव्हिड इस्टन, आमंड आणि पॉवेल, रश आणि अल्थॉफ यांच्यापैकी कोणत्याही दोन विचारवंतांच्या व्याख्या लिहिणे.

राजकीय सामाजिकीकरणाची साधने – १) कुटुंब व्यवस्था २) शिक्षण संस्था ३) राजकीय पक्ष ४) कार्यक्षेत्र ५) प्रसारमाध्यमे ६) दबावगट ७) सांस्कृतिक संस्था–संघटना ८) राजकीय व्यवस्थेशी संबंध इत्यादी साधने थोडक्यात स्पष्ट करणे.

समारोप – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**प्र. २. 'राजकीय श्रेष्ठजन' ही संकल्पना खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा.**
**अ) राजकीय श्रेष्ठजनांचा आकृतिबंध आ) राजकीय श्रेष्ठजन निर्मितीचे घटक** **गुण : १५**

**उत्तर – प्रस्तावना –** राजकीय श्रेष्ठजनाची व्याख्या व अर्थ लिहिणे.

राजकीय श्रेष्ठजन –

**अ) राजकीय श्रेष्ठजनांचा आकृतिबंध –** रॉबर्ट डाल या विचारवंताने राजकीय सत्ता शोधनासंबंधीचा आकृतिबंध मांडला. सर्वाधिक लोकसंख्येचा सामान्य जनतेचा स्तर असतो. यातील काहीच लोक सक्रिय राजकीय कार्यकर्ते बनतात. त्यातील काही थोडे प्रभावी लोकच राजकीय श्रेष्ठीजन बनतात. (आकृती आवश्यक)

**आ) राजकीय श्रेष्ठजन निर्मितीचे घटक –** १) परंपरागत पद्धत २) अर्जित पद्धत ३) नेमणुकीची प्रक्रिया ४) सत्तेची सोपान परंपरा.

समारोप – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**प्र. ३. पुढील प्रश्नांची २५–३० ओळींत उत्तरे लिहा. (कोणतीही दोन)** **गुण : १५**

**अ) वर्तनवादाची वैशिष्ट्ये आणि दोष विशद करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** सामाजिकशास्त्रात अधिक शास्त्रशुद्ध, वस्तुनिष्ठता येण्यासाठी प्रश्नावली, पाहणी, मुलाखती, माहिती गोळा करून तिचे विश्लेषण करणे इत्यादी तंत्रांचा वापर करण्यात येऊ लागला. यातूनच वर्तनवादाचा उदय झाला.

**वर्तनवादाची वैशिष्ट्ये –** १) नियमितता २) पुनर्तपासणी ३) योग्य तंत्रांचा वापर ४) संख्यात्मकता ५) मूल्यनिरपेक्षता ६) पद्धतशीरपणा ७) शुद्ध विज्ञान ८) आंतरशास्त्रीय दृष्टिकोन इत्यादी.

**वर्तनवादावरील दोष –** १) राज्यशास्त्राकडून राजकारणाकडे २) शास्त्रीयत्वाचा अतिरेक ३) मूल्य निरपेक्षता ४) स्थल–काल निरपेक्षता ५) अति तांत्रिकीकरण इत्यादी मुद्द्यांच्या आधारे वर्तनवादावरील दोष लिहिणे अपेक्षित आहे.

समारोप – वरील माहितीच्या आधारे समारोप लिहावा.

**ब) राजकीय संस्कृतीची व्याख्या सांगा. राजकीय संस्कृतीचे घटक स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** राजकीय संस्कृतीचे महत्त्व थोडक्यात लिहावे. राजकीय संस्कृतीची व्याख्या – ग्रॅबिएल आमंड, सिडने व्हर्बा यांनी केलेल्या व्याख्या लिहिणे. राजकीय संस्कृतीचे घटक – १) सामाजिक परिस्थिती २) वांशिक भिन्नता ३) भाषिक भिन्नता ४) धार्मिक भिन्नत्व ५) शिक्षण व्यवस्था ६) इतिहास ७) भौगोलिक परिस्थिती ८) अर्थव्यवस्था ९) मानसिक घटक इत्यादी घटक थोडक्यात स्पष्ट करणे.

समारोप – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**क) राजकीय व्यवस्थेची वैशिष्ट्ये आणि कार्ये स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** राजकीय व्यवस्थेच्या व्याख्या व अर्थ लिहिणे. राजकीय व्यवस्थेची वैशिष्ट्ये – १) व्यापकता २) परस्परावलंबी ३) सीमारेषा. राजकीय व्यवस्थेची कार्ये – १) राजकीय भरती व राजकीय सामाजिकीकरण २) हितसंबंधाचे प्रकटीकरण ३) हितसंबंधाचे सुसूत्रीकरण ४) राजकीय संसूचन.

समारोप – नियमांची निर्मिती, कायदे निर्मिती, कायद्यांची अंमलबजावणी आणि न्यायदान ही राजकीय व्यवस्थेची महत्त्वाची प्रदान कार्ये आहेत.

**ड) नैसर्गिक शास्त्रांची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** (नैसर्गिक शास्त्रे कोणत्या शास्त्रांना म्हटले जाते. १) स्थलनिरपेक्षता २) कालनिरपेक्षता ३) मूल्यनिरपेक्षता ४) वस्तुनिष्ठता ५) वैश्विकता ६) संख्यात्मकता.

समारोप.

**प्र. ४. टिपा लिहा. (कोणत्याही दोन) गुण : १५**

**अ) वर्तनवादोत्तर प्रवाह**

**उत्तर – प्रस्तावना –** १) मूल्यांना स्थान २) अभ्यासाच्या गाभ्याला महत्त्व ३) शुद्ध शास्त्रीयतेचे अतिरेकी फॅड दूर करणे ४) पारंपरिक राज्यशास्त्र व आधुनिक राज्यशास्त्र यांची सांगड घालणे.

समारोप.

**ब) राजकीय सामाजिकीकरणाची वैशिष्ट्ये**

**उत्तर – प्रस्तावना –** १) सतत घडणारी क्रिया २) विशिष्ट दृष्टिकोन ३) व्यक्त आणि अव्यक्त राजकीय सामाजिकीकरण ४) अनुभवजन्य राजकीय सामाजिकीकरण ५) प्रभावाची भिन्नता.

समारोप.

**क) वेब्लेनच्या मते श्रेष्ठजनांची वैशिष्ट्ये**

**उत्तर – प्रस्तावना –** १) श्रीमंतीची चढाओढ २) कृत्रिम सुंदरता ३) अधिक उपभोग ४) अधिक रिकामा वेळ ५) सुखवस्तू श्रेणीचा पुराणमतवादीपणा ६) व्यक्तींची कार्यक्षमता त्याच्या पैसे मिळवण्याशी निगडित ७) आर्थिक लाभासाठी शिक्षण ८) पैशासंबंधी विचार ९) यंत्रवत विचार १०) युद्धाला पाठिंबा.

समारोप.

**ड) राजकीय संस्कृतीची प्रतीके**

**उत्तर – प्रस्तावना –** राष्ट्रीय प्रतीकांचे महत्त्व – १) राष्ट्राबद्दलची आत्मीयता दर्शवण्यासाठी २) राजकीय सातत्य, स्थैर्य टिकविण्यासाठी ३) विशिष्ट राष्ट्रीय मूल्ये बिंबवण्यासाठी ४) समाज संघटित करण्यासाठी ५) आंतरराष्ट्रीय क्षेत्रात देशाची प्रतिमा उभी करण्यासाठी.

समारोप.

**प्र. ५. राजकीय संस्कृतीचे वर्गीकरण पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा. गुण : २०**

**अ) आमंड आणि व्हर्बा यांचे राजकीय संस्कृतीचे वर्गीकरण आ) फायनर यांचे राजकीय संस्कृतीचे वर्गीकरण इ) राजकीय संस्कृतीचे महत्त्व**

**प्रस्तावना –** राजकीय संस्कृती संकल्पनेचा अर्थ –

**अ) आमंड आणि व्हर्बा यांचे राजकीय संस्कृतीचे वर्गीकरण – वर्गीकरणाचे निकष –** १) शासनाकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन २) शासनकर्त्यांविषयी लोकांचा दृष्टिकोन ३) शासनाच्या धोरणांविषयी लोकांचा दृष्टिकोन ४) व्यक्तिगत दृष्टिकोन

**राजकीय संस्कृतीचे वर्गीक़रण –** अ) संकुचित राजकीय संस्कृती आ) आज्ञांकित राजकीय संस्कृती इ) सहभाग प्रधान राजकीय संस्कृती

**आमंड आणि व्हर्बा यांच्या वर्गीकरणाचे दोष –**

**आ) फायनर यांचे राजकीय संस्कृतीचे वर्गीकरण –** १) अल्पमत राजकीय संस्कृती २) निःशक्त राजकीय संस्कृती ३) उत्कर्षाप्रत राजकीय संस्कृती ४) पूर्ण विकसित राजकीय संस्कृती.

**राजकीय संस्कृतीचे महत्त्व –** १) राजकीय संस्कृतीचा राजकीय व्यवस्थेवर प्रभाव पडतो. २) राजकीय संस्कृतीच्या अभ्यासातून बदलत्या परिस्थितीचा प्रभाव अभ्यासता येतो. ३) जागतिक स्थित्यंतराचा अभ्यास करता येतो. ४) संस्कृतीने स्वीकारलेल्या नवीन मूल्यांचा परिचय होतो.

समारोप.

**किंवा**

**क्षेत्रीय कार्य –** आपल्या गावातील महत्त्वाच्या नेत्याची/पुढाऱ्याची माहिती पुढील मुद्द्यांच्या आधारे गोळा करून २ फुलस्केप पाने टिपण लिहा. **गुण : २०**

पुढाऱ्याचे – नेत्याचा धर्म, नेत्याची जात, नेत्याचे वय, नेत्याचे लिंग, नेत्याचे शिक्षण/सांपत्तिक स्थिती. चळवळीशी संबंध कधीपासून, कारण काय होते, राजकीय पक्ष दबाव गट/चळवळीतील भूमिका–कार्य, वरील आर्थिक सामाजिक घटकांचा नेत्याच्या मोठेपणावर, कार्यावर प्रभाव पडला का ?

समारोप.

# राजकीय समाजशास्त्र (PC-602)

## सत्र – ६

## प्रकरण क्र. ६ ते ११

---

**प्र. १. राजकीय पक्षाची व्याख्या सांगून कार्ये विशद करा.** **गुण : १५**

**उत्तर – प्रस्तावना –** राजकीय पक्षाच्या व्याख्या स्पष्ट करणे.

राजकीय पक्षाची कार्ये – १) विशिष्ट तत्त्वप्रणालीचा पुरस्कार करणे २) घटनात्मक मार्गांनी शासननिर्मिती करणे ३) शांततेच्या मार्गाने सत्ताबदल घडवून आणणे ४) लोकशिक्षण व लोकप्रबोधन करणे ५) लोकमत संघटित करणे ६) प्रातिनिधिक लोकशाही राबविणे ७) लोकांचे प्रश्न, मत शासनापर्यंत पोहोचवणे.

समारोप.

**प्र. २. भारतातील राजकीय विकासाचे घटक आणि अडथळे स्पष्ट करा.** **गुण : १५**

**उत्तर – प्रस्तावना –** राजकीय विकासाचा अर्थ व व्याख्या लिहिणे.

**भारतातील राजकीय विकासाचे घटक –** १) राजकीय संरचना २) राजकीय पक्ष ३) सरकार ४) प्रशासन ५) पंचायत राज्य व्यवस्था ६) विविध चळवळी – सहकार चळवळ, स्त्रीमुक्ती चळवळ, दलित चळवळ इ. घटक थोडक्यात स्पष्ट करणे.

**भारतातील राजकीय विकासातील अडथळे –** १) दहशतवाद २) दारिद्र्य, बेकारी व विषमता ३) भ्रष्टाचार ४) प्रादेशिकवाद ५) धार्मिकवाद ६) जातिवाद इ. अडथळे थोडक्यात लिहिणे.

समारोप – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**प्र. ३. पुढील प्रश्नांची २५–३० ओळींत उत्तरे लिहा. (कोणतीही दोन)** **गुण : १५**

**अ) राजकीय पक्षपद्धतीचे आधार स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** १) वैचारिक भिन्नता २) राष्ट्रवाद ३) आर्थिक विचारसरणी ४) अंतर्गत राजकीय मतभेद ५) सामाजिक व धार्मिक विचारसरणी ६) व्यक्तिनिष्ठा.

समारोप.

**ब) हंटिंग्टन यांचे राजकीय विकासाबाबतचे विचार लिहा.**

**उत्तर – प्रस्तावना –** राजकीय विकासाचे निकष – १) राजकीय स्थैर्य २) राजकीय सहभाग ३) संस्थिभवन – संस्थिभवनाचे ४ घटक – १) जुळवून घेण्याची क्षमता २) श्रेणीबद्ध रचना ३) संघटनेची स्वायत्तता ४) संघटनेचे ऐक्य.

समारोप.

**क) भारतातील दबावगट यावर टिपण तयार करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** २ गट – १) पारंपरिक दबावगट २) आधुनिक दबावगट

अ) उद्योगसमूह आ) कामगार संघटना इ) शेतकरी संघटना ई) विद्यार्थी संघटना उ) सुशिक्षित व्यावसायिक

संघटना (डॉक्टर, वकील इ.) ऊ) जमातवादी संघटना इ.

समारोप.

**ड) स्त्रियांना मतदान हक्क देण्याबाबत अनुकूल व प्रतिकूल कोणते मुद्दे मांडण्यात आले?**

**उत्तर – प्रस्तावना –** अनुकूल मुद्दे, प्रतिकूल मुद्दे

समारोप.

**प्र. ४. टिपा लिहा. (कोणत्याही दोन)** **गुण : १५**

**अ) राजकीय पक्ष पद्धतीचे प्रकार**

**उत्तर – प्रस्तावना –** राजकीय पक्षाची व्याख्या, कार्ये स्पष्ट करणे.

राजकीय पक्ष पद्धतीचे प्रकार – १) द्विपक्ष पद्धती २) अनेकपक्ष पद्धती ३) एकपक्ष पद्धती

समारोप – राजकीय पक्ष पद्धतीचे गुण व दोष थोडक्यात लिहिणे.

**ब) दबावगट विषयक दृष्टिकोन**

**उत्तर – प्रस्तावना –** दबावगटाची व्याख्या, कार्ये याबाबत थोडक्यात लिहिणे.

दबावगट विषयक दृष्टिकोन – १) लोकशाही व्यवस्थेतील दबावगट – यातील तंत्रे लिहिणे आवश्यक. २) सर्वंकष व्यवस्थेतील दबावगट ३) विकसनशील देशातील दबावगट.

समारोप – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**क) प्रादेशिक प्रतिनिधित्व पद्धती**

**उत्तर – प्रस्तावना –** प्रतिनिधी निवडण्याची सर्वांत सोयीस्कर, सोपी व लोकप्रिय रूढ असलेली पद्धत म्हणजे प्रादेशिक प्रतिनिधित्वाची पद्धत होय.

**प्रादेशिक प्रतिनिधित्व पद्धती – १) गुण –** १) प्रत्येक मतदारसंघातून एक प्रतिनिधी कायदेमंडळावर पाठविण्यात येतात. २) सुटसुटीतपणा ३) मतदारांशी संपर्क व जवळीक.

**२) दोष –** १) निवड करण्यास मर्यादित वाव २) तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन कायदा करताना मिळत नाही. ३) प्रादेशिक, जातीय व हितसंबंधी गटांना उत्तेजन मिळते. ४) अल्पसंख्याकांचे शासन होण्याची शक्यता.

समारोप – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**ड) व्यावसायिक प्रतिनिधित्व पद्धती**

**उत्तर – प्रस्तावना –** अर्थ, गुण–दोष

समारोप.

**प्र. ५. राजकीय संसूचनाची संकल्पना स्पष्ट करून संसूचनाची प्रक्रिया व संसूचनाची साधने सांगा.**

**गुण : २०**

**प्रस्तावना –** राजकीय संसूचनांचा अर्थ व व्याख्या, संसूचनाच्या प्रक्रियेतील घटक, राजकीय संसूचनांची साधने – वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन, नाटके, चित्रपट, सभा–संमेलने इ.

समारोप.

**किंवा**

**क्षेत्रीय कार्य –** तुमच्या गावात/शहरात असलेल्या कोणत्याही एका दबावगटाची पुढील मुद्द्यांच्या आधारे माहिती गोळा करा व त्याबाबत २–३ फुलस्केप पानांचे टिपण तयार करा. **गुण : २०**

१) दबावगटाचे नाव
२) दबावगटाचे सभासद/सदस्य, त्यांची संख्या
३) दबागटाची संघटना – पदाधिकारी, रचना
४) दबावगटाची साधनसामग्री
५) दबावगटाची कार्यपद्धती
६) दबावगटाने सोडवलेला एखादा प्रश्न
समारोप.

---

**Reference -** राजकीय समाजशास्त्र Political Sociology या विषयासाठी इंग्रजी पुस्तक. सेमी. ५ व ६. Principles and Theory of Political Science - Sharma Urmila and Sharma S. K.

***